# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र.: विकमं/२०१३–१४/५७९ दिनांक : १८/१२/२०१३.

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व

महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषय:– विद्यापीठस्तरीय 'गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास' शिबिराबाबत.....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे, अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर ४२२ ६०१ यांचे संयुक्त विद्यमाने **दि. ४ ते ६ जानेवारी, २०१४** या कालावधीत विद्यापीठस्तरीय 'गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास' शिबिराचे अकोले तालुक्यातील रतनवाडी (अमृतेश्वर मंदिर परीसर) रतनगड, भंडारदरा परिसरात आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विभागातील एक अथवा जास्तीत जास्त दोन विद्यार्थ्यांची (एक विद्यार्थी–एक विद्यार्थिनी) नावे **ईमेल (ashokdatir526@gmail.com) अथवा टपालाने संबंधित महाविद्यालयास सोमवार, ३० डिसेंबर, २०१३** पर्यंत पाठवावीत.

सदर शिबिरात सहभागी विद्यार्थी/विद्यार्थिनींना **शनिवार, दि. ०४/०१/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा. पर्यंत महाविद्यालयाच्या ओळखपत्रासह** अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे, अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर महाविद्यालयात उपस्थित राहणेबाबत सूचित करावे.

सदर पत्र आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विभागातील सूचना फलकांवर प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

कळावे,

**अधिक माहितीसाठी व संपर्कासाठी :** प्रा. डॉ. अशोक दातीर : ९४२०९४५६२८.
प्रा. डॉ. बाबासाहेब देशमुख : ९८२२५९९०९१.

**सोबत : महाविद्यालयाचे पत्र.**

(स्वाक्षरी) १८/१२/१३

संचालक,

विद्यार्थी कल्याण मंडळ

(शिक्का: विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे-४११००७, पुणे विद्यापीठ)

I.D.No.PU/AN/ASC/018/1974
HSC / 1176 / July 1976 Dt. 1.7.76.
HSC. No.J-12.01.001

NAAC Accredited : B++

साहसे श्री: प्रतिवसति ।
Akole Taluka Education Society's,

# AGASTI ARTS, COMMERCE & DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE, AKOLE

A/p. Tal. Akole, Dist. Ahmednagar, Pin - 422601,(Maharashtra).

**Prof. Rameshchandra Khandge**
Principal

PUNE UNIVERSITY BEST COLLEGE AWARD FIRST PRIZE WINNER-2007

जा. क्र. : एसी/विकमं/८३२/२०१३ दि. १४/१२/२०१३

प्रति,
मा. प्राचार्य/ विद्यार्थी कल्याण अधिकारी,

विषय:- विद्यापीठस्तरीय "गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास" या शिबीराबाबत...

महोदय,

महाराष्ट्रातील पश्चिम घाट नेहमीच गिर्यारोहण व जैविक विविधतेच्या अभ्यासासाठी कुतुहलाचा विषय राहिलेला आहे. पुणे विद्यापीठाशी सलग्न असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या अभ्यासासाठी संधी उपलब्ध व्हावी या हेतूने पुणे विद्यापीठ-विद्यार्थी कल्याण मंडळ व आमच्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने **दि. ४ ते ६ जानेवारी, २०१४** या कालावधीत विद्यापीठस्तरीय "गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास" या शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबिराचे ठिकाण अकोले तालुक्यातील रतनवाडी (अमृतेश्वर मंदिर परीसर), रतनगड, भंडारदरा परिसर हे आहे. या शिबीरात प्रत्यक्ष गिर्यारोहण, तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व चर्चा, स्लाईड शो ई. उपक्रमांचे आयोजन केले आहे.

या शिबीराचे उदघाटन मा. ना. मधुकररावजी पिचडसाहेब, मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा यांच्या शुभहस्ते होणार असून, आपल्या महाविद्यालयातील एक अथवा जास्तीत जास्त दोन विद्यार्थ्यांची (एक विद्यार्थी- एक विद्यार्थीनी) निवड करून त्यांची नावे ashokdatir526@gmail.com या ईमेलवर किंवा टपालाने आम्हास ३०/१२/२०१३ पर्यन्त पाठवावीत. सदर विद्यार्थ्यांना या शिबिरासाठी **शनिवार दि. ०४/०१/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा. पर्यन्त आमच्या महाविद्यालयात** उपस्थित राहण्यास व येताना त्यांचे महाविद्यालयाचे ओळखपत्र घेऊन येण्यास सूचित करावे ही विनंती.

शिबीरार्थीची शिबिराच्या ठिकाणी निवास व भोजनाची व्यवस्था केली असून त्यांचा प्रवासखर्च त्यांच्या महाविद्यालयाने करावा. थंडीचे दिवस असल्याने आवश्यक ते उबदार कपडे, शाल, शुज, औषधे, नोटबुक, पेन ई. साहित्य सोबत घेऊन यावे.

कळावे,

आपले विश्वासू

(अशोक दातीर)
९४२०९४५६२८, ashokdatir526@gmail.com
विद्यार्थी कल्याण अधिकारी,

(रमेशचंद्र खांडगे)
प्राचार्य,
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

टीप: शिबिरस्थळी येण्यासाठी नाशिक, पुणे व अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थ्यांनी संगमनेर येथे येवून, अकोले येथे यावे. संगमनेर अकोले हे अंतर २२ किमी. आहे. संपर्कासाठी प्रा. डॉ. अशोक दातीर (विद्यार्थी कल्याण अधिकारी)- ९४२०९४५६२८ व प्रा. डॉ. बाबासाहेब देशमुख (संयोजक)- ९८२२५९९०९१.